237

# महाराष्ट्र शासन

सिनाला २०१८/प्र.क्र.२५८/जस-८

ग्रा वि व ज.सं विभाग /जल-७/२०१७
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २३ मे, २०१७

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी,

विषय: जलयुक्त शिवार अभियानातंर्गत गाव आराखड्यातील क्षेत्र उपचाराची कामे ७०% पूर्ण झाल्यानंतर सिमेंट नालाबांधचे काम हाती घेण्याबाबत.

दुष्काळमुक्त महाराष्ट्र सन - २०१९ या कार्यक्रमातंर्गत राज्यामध्ये सन २०१५-१६ पासून जलयुक्त शिवार अभियान हा महत्वाकाक्षी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमातंर्गत दरवर्षी ५००० गावे व ५ वर्षात २५००० गावे टंचाईमुक्त करण्याचे शासनचे धोरण आहे. राज्य शासन, केंद्र शासन, जिल्हा नियोजन विकास समिती व अन्य निधी स्त्रोतांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या मृदसंधारणाच्या / जलसंधारणाच्या योजनांची एकत्रित व एकात्मीक पध्दतीने अमलबंजावणी या अभियानात करण्यात येत आहे याकरीता गॅप फंडीगसाठी शासनाकडून विशेष अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

०२. पाणलोट विकास हा या कार्यक्रमाचा गाभा असून, पाणलोट विकासाच्या धर्तीवर म्हणजेच माथा ते पायथा या तत्वावर या अभियानातंर्गत कामे करण्यात येत आहेत. त्या नुसार सिमेंट नाला बांध हा उपचार देखील अशा गावांमध्ये प्रस्तावित करण्यात येत असून, या संदर्भात असे निर्देश देण्यात येत आहेत ही मातीची होणारी धूप थांबविणे व नाल्यामध्ये गाळ जमा होऊ नये या करीता गाव आराखड्यातील क्षेत्र उपचाराची ( Area Treatment ) ७०% कामे पूर्ण झाल्यानंतर अशा निवडलेल्या गावामध्ये सिमेंट नाला बांधची कामे हाती घेण्यात यावीत.

०३. या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे ही विनंती.

आपला,

( एकनाथ डवले )
सचिव, (जलसंधारण), महाराष्ट्र शासन

प्रत अग्रेषीत :-
सर्व विभागीय आयुक्त,
मुख्य अभियंता, लघुसिंचन, जलसंधारण, पुणे.
सर्व, अधिक्षक अभियंता. लघुसिंचन, जलसंधारण.